# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र. रानिआ-१०९७/प्र.क्र. १७२/९७/पंरा.
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई ४०० ०३२.
दिनांक २० ऑक्टोबर १९९७.

## परिपत्रक

**विषय :** जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत निवडणूका मतदार यादीबाबत

जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीसाठी लागू असलेल्या खालील कायद्यातील तरतूदीप्रमाणे जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयुक्त जी तारीख अधिसूचित करतील त्या तारखेस अस्तित्त्वात असलेली विधानसभा मतदार यादी जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या प्रभागामध्ये विभागून व छापून अधिप्रमाणित करून वापरावयाची आहे.

(१) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम नं. ५).

(२) महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम नं. ३).

२. वरील तरतुदीप्रमाणे मतदार यादी करीत असताना विधानसभेच्या मतदार यादीप्रमाणे मतदारांची नावे ज्या जिल्हा परिषदा पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या निवडणूक प्रभागामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्या ऐवजी काही ग्रामपंचायतींच्या संदर्भात ज्या मतदारांची नावे अन्य प्रभागामध्ये समाविष्ट होऊन छापली गेल्याचे तसेच जिल्हा परिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायत क्षेत्रासाठी राज्य निवडणूक आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीत नावे आहेत, परंतु जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय मतदार यादी तयार करून छापताना जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या कोणत्याही निवडणूक प्रभागामध्ये नावे समाविष्ट न केल्याचे तसेच महानगरपालिका, नगरपरिषदांच्या निवडणुक प्रभागामध्ये ही ती नावे छापल्याचे राज्यनिवडणूक आयोगाच्या निदर्शनास आणण्यात आले आहे. वरील वस्तुस्थितीचा विचार करून यासंदर्भात राज्य निवडणूक आयुक्त आदेश देत आहेत ते खालीलप्रमाणे :—

(१) विधानसभा मतदार यादीवरून जिल्हा परिषद व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकासाठी मतदार याद्या बनविण्याची प्रक्रीया करीत असताना जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत यांच्या प्रभगांमध्ये विधानसभा मतदार यादीची विभागणी प्रभागावर करावयाची असते. म्हणजे ही प्रक्रिया फक्त कापणे आणि जोडणे या प्रकारची आहे. अशाप्रकारे मतदार यादी प्रभागामध्ये विभागून छापून घेताना काही त्रुटी निर्माण झाल्यास त्या दुरुस्त करण्यासंबंधित कायद्यामध्ये तरतूद करण्यात आलेली नाही परंतु, विधानसभा मतदार यादीमध्ये नावे समोवष्ट असलेली मतदार यादी तयार करणाऱ्या व ती अधिप्रमाणित करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या चुकांमुळे पात्र मतदारांना संबंधित प्रभागामध्ये मतदान करण्यापासून वंचित करणे योग्य होणार नसल्याकारणाने भारतीय संविधानाच्या कलम २४३ के व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महाराष्ट्र अधिनियम नं. ५) चे कलम १३ व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम नं. ३) चे कलम १२ मधील तरतूदी व इतर प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून राज्य निवडणूक आयुक्त महाराष्ट्र असे आदेश देत आहेत की, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी वर नमूद केलेल्या संबंधित कायद्यातील तरतुदीप्रमाणे आयुक्तांनी अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत यांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करून छापून घेतल्यानंतर विधानसभेच्या मतदार यादीप्रमाणे एखाद्या मतदाराचे नाव अगर मतदारांची नावे विधानसभा मतदार यादीचा विचार करताना जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या ज्या प्रभागामध्ये नाव/नावे समाविष्ट करणे आवश्यक आहे त्याऐवजी दुसऱ्याच प्रभागामध्ये नाव/नावे समाविष्ट झाली असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा नगरपालिका/नगरपरिषदा यांच्या मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट झाले असल्याचे निदर्शनास आल्यास वर नमूद केलेल्या तरतुदीप्रमाणे मतदार यादी अधिप्रमाणित करण्यासाठी सक्षम असलेल्या अधिकाऱ्याने अशा नावांची यादी करून त्याखाली तारखेसह सही करून अधिप्रमाणित करावी व ती यादी संबंधित प्रभागाच्या मतदार यादीसोबत जोडावी.

(२) तसेच विधानसभा मतदार यादीत नाव आहे परंतु, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतीच्या प्रभागनिहाय तयार केलेल्या कोणत्याही प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट नसल्याचे निदर्शनास आल्यास कायद्यातील वर नमुद केलेल्या तरतूदीप्रमाणे मतदार यादी अधिप्रमाणित करण्याचे सक्षम केलेल्या अधिकाऱ्याने अशा नावांची यादी करून त्या खाली तारखेसह सही करून अधिप्रमाणित करावी व ती यादी संबंधित प्रभागाच्या मतदार यादीसोबत जोडावी.

(३) वरीलप्रमाणे तयार केलेल्या यादीतील मतदारांस/मतदारांना संबंधित प्रभागाच्या निवडणुकीसाठी मतदान करण्यास परवानगी देण्यात यावी.

(४) त्यासंदर्भात आवश्यक त्या सूचना निर्वाचन अधिकारी व केंद्राध्यक्ष यांना द्याव्यात.

(५) तसेच वरील अनुक्रमांक (१) व (२) प्रमाणे तयार केलेल्या यादीची एक प्रत त्या प्रभागाच्या मतदार यादीमध्ये चुकीने नाव/नावे समाविष्ट झाली असतील त्या प्रभागाच्या मतदान केंद्राध्यक्षांकडे देऊन बोगस मतदान होणार नाही, अशी दक्षता घेण्याबाबत त्यांना सूचना द्याव्यात.

३. निवडणूका स्वच्छ, निर्भय व खुल्या वातावरणात होण्याच्या दृष्टीने भारताच्या संविधानात सुधारणा करून राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी निवडणूका घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे स्वतंत्र अधिकारी/कर्मचारी निर्माण केलेले नसल्यामुळे राज्य निवडणूक आयोगास जिल्ह्यातील सरकारी व स्थानिक स्वराज्य संस्थांमधील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडूनच निवडणुकीची काम करून घ्यावयाचे आहे व त्यासाठी कायद्यातील तरतूदीनुसार असे अधिकारी/कर्मचारी हे राज्य निवडणूक आयोगाच्या पर्यवेक्षण/निदर्शन व नियंत्रण याखाली निवडणुकीची कामे करीत असतात. निवडणुकीसाठी प्रभाग रचना करणे, मतदार यादी तयार करणे व प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पूर्ण करणे या सर्व बाबी अत्यंत जबाबदारीच्या असून, त्या कामी कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा करणे ही बाब अत्यंत गंभीर असून, अक्षम्य आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयुक्तांचे असेही आदेश आहेत की, जेथे अशा प्रकारच्या चुका झाल्याचे दिसून येईल त्या प्रकरणात संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूद्ध विभागीय चौकशी त्वरीत सुरू करावी व त्याचा प्राथमिक अहवालही राज्य निवडणूक आयोगास त्वरीत पाठववा.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**(अपर्णा जोशी)**
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग.

प्रत रवाना :
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त.